## स्पेशल दिवाणी मुकदमा नं. ४५/२०१३ मधील
## निशाणी ५ खालील आदेश
## ( श्रीमती. अरुणा पाटील वि. श्रीमती. इंदुबाई पाटील )

१. प्रस्तूतचा अर्ज वादीने प्रतिवादींविरुध्द् तुर्तातुर्त मनाईसाठी दाखल केला आहे.

२. मौजे बेडग ग्रामपंचायत हद्दीतील गट नं. १३१८/१, क्षेत्र १० हेक्टर ३३ आर पैकि ६ हेक्टर ४२ आर शेतजमिन व त्यामधील चार खणाचे पुर्व बाजूचे घर हे या दाव्याचा ''वाद विषय'' आहेत. वादींचे सासरे शिवाजी बाजीराव पाटील यांना १० हेक्टर ३३ आर वाटणीस आलेली होती. शिवाजी पाटील दिनांक २५.०५.२००४ रोजी मयत झालेले आहेत. प्रतिवादी १ – श्रीमती. इंदुबाई पाटील ही शिवाजीची पत्नी असून प्रतिवादी २ – विकास पाटील तसेच मयत संजय व मयत राजेश ही तीन मुले आणि प्रतिवादी ३ – सौ. शोभा माने ही शिवाजीची मुलगी आहे. वादी– श्रीमती. अरुणा पाटील मयत राजेश यांची पत्नी आहे. दिनांक ०९.०५.२००६ पासून राजेशची पत्नी म्हणून वादी नांदण्यास होती. राजेश दारु, मावा, गुटखा याच्या आहारी गेलेला होता. प्रतिवादी १ व २ हे राजेशच्या नशापुर्तीसाठी पैसे देत असत. प्रतिवादी २ – विकास पाटील हे राजेशला दारु पाजून खोटे व बनावट दस्त करुन घेण्यात पटाईत होते. व्यसनाच्या आहारी जावून दिनांक ३१.१२.२००४ रोजी राजेशने नोंद दस्त क्रमांक ४४१८/२००४ हे बक्षीसपत्र करुन दिल्याचे त्याचे मृत्यूनंतर वादीस समजले. मृत्यूपुर्वी दिड ते दोन वर्षे राजेश

अंथरुणाला खिळून होता. तथापि, त्यांच्या व्यसनाचा फायदा घेवून प्रतिवादी व अन्य लोकांनी को–या कागदावर त्यांच्या सहया करुन घेतलेल्या आहेत. अशा परिस्थितीत राजेशच्या मृत्यूनंतर दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप करुन मागितले असता, प्रतिवादींनी तिचा शेअर देण्यास नकार दिला. दावा मिळकतीचे कागदपत्र काढले असता, बेकायदेशिरपणे प्रतिवादी १ व ३ यांनी संगनमताने प्रतिवादी ४ व ५ यांना दस्त कमांक १९५३/२०१२ अन्वये दावा मिळकतीमधील पश्चीम बाजूचे १ हेक्टर १८ आर क्षेत्र रक्कम रु. २६,५५,०००/– इतक्या मोबदल्यात खरेदी दिलेली आहे असे समजले. सदर खरेदी दस्तास वादीची संमती नाही. दावा मिळकतीत वादीची समाईकात कब्जेवहिवाट होती व आहे. वादीने पुर्वेकडील भागात ऊसाचे पिक घेतलेले आहे व सदर ऊस वसंतदादा सहकारी साखर कारखाना येथे पाठविलेला आहे. सदर जमिनीमध्ये ९ खणांचे घर आहे, तसेच वादीच्या नावाची रेकॉर्डसदरी नोंद आहे. वादी ही राजेशची कायदेशिर वारस आहे. अदयाप दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने तुटक वाटप झालेले नाही. जानेवारी २०१३ मध्ये वादीने तिचा हिस्सा मागितला असता, प्रतिवादींनी, ''वाद मिळकत इन्य इसमांस विल्हे, विक्री, तबदिली व बोजे निर्माण करण्याची धमकी दिली''. वादीने प्रांत साहेब, मिरज यांचेकडे अर्ज दिला असता, त्याठिकाणी प्रतिवादींनी बनावट तक्रारी अर्ज दिले. प्रतिवादी हे वादीच्या दावा मिळकतीवरील हक्क व हिस्सा वापरत आहेत व केंव्हा काय करतील याचा नेम नाही. प्रतिवादींनी अन्य इसमांस वाद मिळकत विक्री केलेस अथवा बॅक बोजा निर्माण केलेस वादीला तिचा कायदेशिर हिस्सा मिळणार

नाही. प्रथमदर्शनी वादीस केस आहे. न्यायाचा तौलानिक कल वादीच्या बाजूने आहे व ग्रेटर हार्डशिप वादीस होणार आहे. या परिस्थितीचा विचार करुन प्रतिवादी १ ते ५ यांनी दावा मिळकतीमध्ये फेरबदल करु नयेत, मिळकत विल्हे, विक्री, तबदिली करु नये व वादीच्या न्यायिक हक्कास बाधा येईल अशी कृत्ये करु नयेत याकरिता तुर्तातूर्त ताकिद देणेत यावी.

३. प्रतिवादी १ व २ यांनी निशाणी ४९ ला म्हणणे देवून अर्जातील संपूर्ण कथन नाकबूल केले आहे. वादीस दावा दाखल करण्याचा हक्क नाही, वादी स्वच्छ हाताने कोर्टात आलेला नाही. दाव्यातील अगर ताकिद अर्जातील मागणी tenable नाही. त्याचप्रमाणे ७/१२ उता–यावरील सर्व हिस्सेदारांना/ प्रतिवादींस पक्षकार केल्याखेरीज वादीचा दावा tenable नाही अशा हरकती घेतलेल्या आहेत. वादीच्या वतीने दावा मिळकतीतील त्यांचा हक्क् व हिस्सा राजीखुषीने व समजून उमजून तिच्या पतीने तबदील केलेला आहे व कांही क्षेत्राचा करारही केलेला आहे. त्यामुळे त्याच्या हयातीत दावा मिळकतीतील कोणतेही क्षेत्र शिल्लक नव्हते. दावा मिळकतीचे वर्णन मोघम व चुकीचे केलेले आहे. कै. राजेश यांनी केलेले सर्व व्यवहार वादीवर बंधनकारक असून त्याची स्पष्ट कल्पना वादीला होती. त्यामुळे प्रतिवादी ४ व ५ यांनी दाखल केलेल्या स्पे.दि.मु.नं. ६/१३ या दाव्यास बगल देण्यासाठी खोटया मजकुराचा दावा आणलेला आहे. वादी दावा मिळकत कसत नाही. वादीच्या नावाची नोंद रेकॉर्डसदरी असलेबाबत त्यांनी नाकबूल केले आहे. कै. राजेश हे व्यसनी नव्हते,

त्यामुळे प्रतिवादींनी दारु पाजून कै. राजेश यांचेकडून कोणतेही दस्त केलेले नाही. सबब, त्याबाबतचा मजकूर खोटा व बदनामी करणारा आहे. वादीचा दावा मिळकतीतील घर अगर शेतात कब्जा नसून ती भेंडवडे, जिल्हा– कोल्हापूर येथे रहाते. मृत्यूपुर्वी राजेश अंथरुणावर खिळून असलेबाबत व त्याला जहॉगीर हॉस्पीटल येथे उपचार केलेबाबतचा मजकूर खोटा व लबाडीचा आहे. प्रतिवादी २ यांनी प्रतिवादी ४ व ५ यांचे हक्कात दिनांक १६.०५.२०१२ रोजी करुन दिलेल्या खरेदीपत्राच्या व्यवहाराबाबत तक्रार करण्याचा वादीस कोणताही हक्क व अधिकार नाही. कै. राजेश यांनी मोठी रक्कम कायदेशिर व प्रापंचिक गरजेपोटी व देणे भागविणेकरीता दिनांक २०.१०.२०११ रोजी प्रतिवादी ४ व ५ यांच्या नावे करार केलेला आहे. प्रतिवादी ३ याने कै. राजेश यांना केलेल्या मदती व प्रेमाखातर, कै. राजेश व प्रतिवादी २ यांनी तिच्या हक्कात १ हेक्टर ६० आर क्षेत्र नोंदणीकृत बक्षीसपत्राने बक्षीस दिलेले आहे. वादीच्या दाव्यास कोणतेही कारण घडलेले नाही. कै. राजेश यांनी त्यांचे हयातीत आवश्यकतेनुसार व गरजेनुसार व्यवहार केले असल्याने वादीची मागणी tenable नाही. वादीस प्रथमदर्शनी केस नाही. सहहिस्सेदाराविरुध्द् मनाई देता येणार नाही. त्यामुळे तुर्तातुर्त मनाईचा विचार करता येणार नाही.

४. प्रतिवादी ३ यांनी निशाणी ७२ वर पुरसिस देवून प्रतिवादी १ व २ चे म्हणणे स्वीकृत केलेले आहे.

५. प्रतिवादी ४ व ५ यांनी निशाणी ४७ वर त्यांची कैफियत व म्हणणे देवून अर्जातील कथन नाकबूल केले आहे. कै. राजेश यांना चेकव्दारे रक्कम रु. ८ लाख दिलेले आहेत. त्यामुळे त्यांचे मृत्यूनंतर वादीने करारपत्राप्रमाणे खरेदीपत्र करुन दयावे याकरिता स्पे.दि.मु.नं. ६/२०१३ दाखल केलेला आहे. करारास अनुसरुन २ हेक्टर ३६ आर मिळकत या प्रतिवादींच्या ताब्यात दिनांक २०.१०.२०११ पासून आहे. प्रतिवादी २ ने कराराप्रमाणे त्याचे हिश्श्याची मिळकत प्रतिवादी ४ व ५ यांना दिनांक १६.०५.२०१२ रोजी खरेदीपत्राने ताब्यात दिलेली आहे. सदरचे खरेदीपत्र कधीही बेकायदेशिर नव्हते. सदरची मिळकत विल्हे, विक्री करण्याचा या प्रतिवादींचा मानस नव्हता व नाही. तुर्तातुर्त मनाई हुकूम झाल्यास प्रतिवादींचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. प्रस्तूत अर्जास कोणतेही कारण घडलेले नाही. प्रतिवादींच्या दाव्यास काटशह देण्यासाठी खोटा दावा केलेला आहे. त्यामुळे तो फेटाळून लावावा अशी विनंती केलेली आहे.

६. उभयपक्षांच्या कथनावरुन यात खालील मुद्दे उपस्थित होत आहेत. सदर मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे विषद केले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने प्रथमदर्शनी केस शाबीत केली आहे काय ? | होकारार्थी |
| २. | न्यायाचा तौलानिक कल वादीच्या बाजूने आहे काय ? | होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ३. | जर मनाई हुकुम नाकारला तर कोणाचे जास्त नुकसान होईल ? | वादीचे |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्दा नं. १ ते ३ करता –

७. मी याकामी उभयपक्षांचा युक्तीवाद ऐकला. वादीतर्फे दाखल यादी निशाणी ४ सोबतचे उतारे, कै. राजेश, कै. संजय व कै. शिवाजी यांचे मृत्यू उतारे, त्याचप्रमाणे खाते उतारे वाचून पाहिले. प्रस्तूत कामी यादी निशाणी ४/११ वर दिनांक ३१.१२.२००४ रोजीचा बक्षीसपत्राचा दस्त दाखल केलेला आहे. सदर दस्ताने कै. राजेश (वादीचे पती) व श्री. विकास (प्रतिवादी २) यांनी सौ. शोभा माने (प्रतिवादी ३) हिच्या नावे गट नं. १३१८/१ पैकी १ हेक्टर ६० आर जिराईत जमिन बक्षीस दिलेली आहे. प्रतिवादी ३ लिहून देणार यांची सख्खी बहिण आहे व मिळकत वडिलार्जित आहे असे बक्षीसपत्रात स्पष्टपणे नमुद केलेले आहे. भाऊ संजय अविवाहीत मयत झाल्याने त्याचे पश्चात त्याचे हिश्शे मालकीच्या मिळकतीमध्ये आम्हांस हक्क प्राप्त होणार असे लिहून देणार यांनी बक्षीपत्रात पान नंबर ५ वर नमूद केले आहे, म्हणजेच दिनांक ३१.१२.२००४ पावेतो दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप झालेले नव्हते व नाही असे प्रथमदर्शनी आढळून येते.

८. दिनांक ३१.१२.२००४ नंतर अगर शिवाजी बाजीराव पाटील यांचे

मृत्यूनंतर दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने प्रतिवादी १ ते ३ व राजेश यांचे दरम्यान वाटप झाले असे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा प्रतिवादींनी हजर केलेला नाही. दिनांक २९.१२.२०११ रोजी वादीचे पती राजेश यांचा मृत्यू झालेला आहे हे निशाणी १२ च्या मृत्यू दाखल्यावरुन विदित होते व त्यानंतर वारसदार म्हणून वादीच्या नावाची नोंद फेरफार नं. २०९९९ ने गट नंबर १३१८ ला झालेली असून ती नोंद दिनांक २१.०३.२०१२ रोजी मंडल अधिकारी, आरग यांनी मंजूर केलेली आहे. याबाबत प्रतिवादी १ ते ३ यांनी कोणताही वाद उपस्थित केलेला नाही.

९. वादी ही कै. राजेशची पत्नी आहे याबाबत प्रतिवादींचे दुमत नाही. वाद मिळकत वडिलार्जित आहे याबाबतही प्रतिवादींनी तक्रार उपस्थीत केलेली नाही. तथापि, प्रतिवादी १ ते ३ यांचे असे कथन आहे कि, कै. राजेश यांचे हयातीतच त्यांचे हिश्श्याची सर्व मिळकत वर्ग व विल्हेवाट केलेली असल्यामुळे, वादीस दावा मिळकतीत हक्क नाही, हे प्रतिवादींचे कथन पुर्णतः चुकीचे असल्याचे त्यांच्या म्हणण्यावरुन व आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येते.

प्रतिवादीने यादी निशाणी ६१/१ अन्वये दिनांक २०.१०.२०११ रोजीचा करार हजर केलेला आहे. तो करार खरेदीपूर्व करार आहे व त्या करारानुसार कै. राजेश यांनी प्रतिवादी ४ व ५ यांना गट नं. १८/१ पैकी पश्चीमेकडील २ हेक्टर ३६ आर जमिन खरेदी देण्याचे आश्वासन दिलेले होते. त्यामुळे त्या करारपत्राची पुर्तता होवून मिळणेसाठी वादीविरुध्द् प्रतिवादी ४ व ५ यांनी स्पे.दि.मु.नं.

६/२०१३ चा दावा दाखल केलेला आहे. यावरुन अद्यापही कै. राजेश यांनी त्यांचे हयातीत त्यांच्या हिश्श्याची संपूर्ण मिळकत विल्हे विक्री केलेली नव्हती असे प्रथमदर्शनी आढळून येते. त्यामुळे कै. राजेशची पत्नी म्हणजे वादी हिचा दावा मिळकतीत हक्क व हिस्सा नाही व तिला दावा करण्यासाठी Locus Standi नाही ही वादींची तक्रार याक्षणी ग्राहय धरता येणार नाही.

१०. हिंदू वारसा कायदा कलम ८ मधील तरतुदीनुसार, ''जर हिंदू व्यक्ती मृत्यूपत्र न करता मयत झाली तर तिचा हिस्सा प्रथमतः परिशिष्टात नमूद वर्ग १ च्या वारसांकडे जातो''. विधवा पत्नी व मयत मुलाची विधवा पत्नी या दोघींचीही गणना वर्ग १ च्या वारसांमध्ये होते. ज्या दिवशी वारसा ओपन होतो, त्यादिवशी विधवेचा पुर्नविवाह झाला नसेल तर निश्चीतपणे मुलांबरोबर हिस्सा मिळण्याचा तिला अधिकार आहे''.

११. प्रस्तूत कामी वादी ही कै. राजेशची विधवा पत्नी आहे. कै. शिवाजी यांच्या मृत्यूनंतर वडिलार्जित मिळकतींचे सरसनिरस मानाने वाटप झालेले आहे अशी प्रतिवादी १ ते ३ यांची केस नाही. अशा परिस्थितीत कै. राजेशची विधवा व कै. शिवाजींची विधवा सून म्हणून दावा मिळकतीत सरसनिरस मानाने वाटणी होवून हिस्सा मिळण्याचा वादीस अधिकार आहे. सबब, वादीस प्रथमदर्शनी केस असल्याचे शाबीत झालेले आहे.

१२. वादीने प्रथमदर्शनी केस शाबीत केलेली आहे. कै. राजेश बरोबर

असलेले वादींचे नाते, दावा मिळकतीचे स्वरुप व कै. राजेश यांचा दावा मिळकतीत असलेला हक्क व हिस्सा या सर्व बाबींचा विचार करुन न्यायाचा तौलानिक कल वादीच्या बाजूने असल्याचे माझे मत आहे.

१३. वादीने बॅक ऑफ इंडिया यांनी तिचेविरुध्द् दाखल झालेल्या कर्जवसूलीच्या दाव्याची म्हणजे दावा रे.दि.मु.नं. ९०/२०१३ ची नोटीस व दावा नक्कल यादी निशाणी ६३/६ वर हजर केलेली आहे. कै. राजेश यांनी रक्कम रु. २,९०,०००/– दिनांक १२.०८.२००३ रोजी घेतलेले होते व कै. राजेश यांची विधवा पत्नी व वारसदार म्हणून बॅकेने कर्ज वसुलीचा दावा वादीविरुध्द् दाखल केलेला आहे. वादीचे असे कथन आहे कि, दावा मिळकतीत तिची कब्जेवहिवाट आहे. वर चर्चिल्याप्रमाणे दावा मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप होवून प्रतिवादींचे हिस्से ठरले असे प्रतिवादी १ ते ३ यांचे कथन नाही. त्यामुळे हिंदू कायदयातील गृहितकानुसार दावा मिळकत अदयापही त्यांच्या समाईक कब्जेवहिवाटीत आहे असे मानावे लागेल. निशाणी ८ चा ७/१२ उतारा, वादी व प्रतिवादी आणि त्याचप्रमाणे अन्य सहहिस्सेदारांची नावे आणेवरीने दाखवितो. सबब, सर्व हिस्सेदारांचा दावा मिळकतीत समाईक कब्जा आहे हे प्रथमदर्शनी आढळून येते. वादीने प्रतिवादीविरुध्द कब्जासाठी तुर्तातुर्त मनाई मागितलेली नाही. तथापि, प्रतिवादी २ ने प्रतिवादी ४ व ५ यांच्या नावे कै. राजेश यांच्या मृत्यूनंतर खरेदीचा दस्त करुन दिलेला आहे. त्यामुळे त्या दस्ता आधारे प्रतिवादी ४ व ५ यांनी मिळकतीची विल्हे विक्री केल्यास पूढील गुंतागुंत वाढणार आहे. त्यामुळे दावा मिळकतींची या दाव्याचा निकाल

होईपावेतो विल्हे विक्री प्रतिवादींनी करु नये व दावा मिळकतीच्या स्वरुपात बदल करु नये अशी तुर्तातुर्त मनाई मागितली आहे. वादी विधवा महिला आहे व तिने तिचे नाव कै. राजेशचे वारस म्हणून दावा मिळकतीच्या रेकॉर्डसदरी लावून घेतले आहे. सर्व प्रतिवादींनी हरकत/ अडथळा निर्माण करुन प्रांत साहेब, मिरज यांचेकडे अपील दाखल केले आहे. कैफियत व म्हणणे देवून प्रतिवादींनी वादींचा हिस्सा नाकारला आहे. या सर्व पार्श्वभूमीचा विचार केला असता, वादीचा न्यायहक्क तिला मिळण्यासाठी व त्याची जपणूक होणेसाठी या दाव्याचा निकाल होईपावेतो वादीने मागणी केल्याप्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकुम देणे आवश्यक असल्याचे दिसून येते. सबब, मुद्दा क्रमांक १ ते ३ चा निष्कर्ष वादीच्या बाजुने दिलेला असून यात खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

[१] वादीचा (निशाणी ५) चा अर्ज मंजूर केलेला आहे.

[२] प्रतिवादी १ ते ५ यांनी दावा मिळकतींची विल्हे विक्री तबदिली करु नये अगर कोणत्याही प्रकारे मिळकतीत फेरबदल, या दाव्याचा अंतिम निर्णय होईपावेतो करु नये अशी तुर्तातुर्त मनाई देण्यात आलेली आहे.

**सही /-**

( सौ. एन.एस. शिंदे )

<u>दि. २८.११.२०१५</u>. सह दिवाणी न्यायालय, व.स्तर, सांगली.